कागदाच्या काटकसरीच्या वापरात
पाणी व उर्जा वाचवण्याचा अभिनव
उपक्रम राबविण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-१११९/(१८७/१६)/तांशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दि.२४ नोव्हेंबर, २०१६

**शासन परिपत्रक:-**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेतील अंतिम वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील काही विद्यार्थ्यांनी कागदाच्या काटकसरीच्या वापराने पाणी व उर्जा वाचविण्या संदर्भात सर्वेक्षण केले आहे. त्यानुसार त्यांनी तयार केलेला अहवाल व काढलेला निष्कर्ष पुढिल प्रमाणे आहेत.

२. अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून पदवी अभियांत्रिकीचे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके, प्रकल्प अहवाल, सेमिनार इ. चे रिपोर्ट सादर करणे क्रमप्राप्त असते. विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणाच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील एकूण १७१० विद्यार्थी, १०, २६००० कागदाचा वापर सत्रकाम सादर करण्यासाठी करतात. (for team work submission) जर या विद्यार्थ्यांनी कागदाच्या दोन्ही बाजूचा वापर केल्यास एका वर्षात ४, १०, ४०० कागदाची बचत करता येवू शकते व त्यामुळे १६४१.६० kwh इतक्या उर्जेची बचत होऊ शकते व राज्य स्तरावर ३, ९७, ४४० kwh व ९९.३६ दशलक्ष कागदांची बचत होऊ शकते. त्यासोबत मोठया प्रमाणामध्ये प्रदुषणामध्ये घट होऊ शकत असल्याबद्दल सदर निष्कर्षात नमूद केले आहे.

उक्त निष्कर्षांचा विचार करता राज्यातील उर्जेची बचत व पर्यावरणाचे संर्वधन हि अत्यंत महत्वाची बाब असल्याने राज्यातील आपल्या अखत्यारीतील सर्व प्रकारच्या



सहसंचालक तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 8653
दिनांक 09 DEC 2016

महाविद्यालये / तंत्रनिकेतनांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांकडुन विविध प्रकारचे प्रकल्प अहवाल, जर्नल्स इत्यादी करीता कागदाच्या दोन्ही बाजुला म्हणजेच पाठपोठ प्रिंट करण्यासाठी न चुकता वापर केल्यास मोठया प्रमाणात पर्यावरणाचा होणारा -हास टाळता येऊ शकेल तसेच उर्जेची व पाण्याचीही बचत करणे शक्य होईल.

तरी या संदर्भात आपल्या अधिपत्याखालील सर्व विभाग, महाविद्यालये, तंत्रनिकेतने यांना आपल्या स्तरावर सविस्तर सुचना संबंधित संस्था / विभाग प्रमुखांना विनाविलंब देण्यात याव्यात.

(प्रकाश भा. आव्हाड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व कुलगुरु, अकृषी विद्यापिठे
कुलगुरु,डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापिठ लोणेरे, ता. माणगांव.
कुलगुरु, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
सर्व कुलसचिव, अकृषी विद्यापिठे राज्य,
सर्व उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
निवड नस्ती तांशि.-२